# <u>सन 2013-14 केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजना अंतरीम मार्गदर्शक सूचना</u>

**<u>पार्श्वभूमी</u> -** महाराष्ट्र राज्याची ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषिवर आधारीत असून दिवसेंदिवस शेती कामासाठी मजुरांची भासणारी कमतरता, मजुरीवरील वाढता खर्च इ. मुळे शेतीमध्ये सुधारीत कृषि औजारे, उपकरणे, संयंत्रे यांचा वापर अनिवार्य झाला आहे. मजुर समस्येमुळे शेती मशागतीची कामे वेळेवर होत नाहीत. त्याचा उत्पादनावर विरीत परीणाम होतो व पर्यायाने पिकांचा उत्पादन खर्चही वाढतो. या बाबी विचारात घेवून कृषि यांत्रीकीकरणास प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने मंजूर केलेली ट्रॅक्टरचलित/स्वयंचलित, बैलचलित कृषि अवजारे अनुदानावर शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजना सन 2013-14 मध्ये राज्यात सर्व जिल्ह्यात राबविण्यात येईल. सदर योजनेखाली केंद्र शासनाने मंजूर केलेल्या अनुदान मर्यादेनुसार कृषि अवजारे व सयंत्रे यांचा अनुदानावर पुरवठा करावयाचा आहे. सदर योजना क्षेत्रीय स्तरावर राबविण्यासाठी खालीलप्रमाणे **अंतरीम मार्गदर्शक सूचना** निर्गमित करण्यात येत आहेत.

**<u>योजनेचा कालावधी</u> -** 1 एप्रिल 2013 ते 31 मार्च 2014

**<u>प्रमुख उद्दिष्टे</u> -** 1) शेतमजूर समस्येवर पर्याय उपलब्ध करणे. 2) शेती कामाचा वेळ वाचवून मशागतीचा खर्च कमी करणे. 3) कृषि यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देवून पिक उत्पादन खर्चात बचत करणे. 4) पिक उत्पादनात वाढ करणे.

**<u>अमंलबजावणी स्तर, कार्यपध्दती, व जबाबदाऱ्या</u> -** योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद हे अंमलबजावणी अधिकारी राहतील. योजनेच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्द्ती अवलंबावी,

1) **<u>प्रसिध्दी</u> -** योजनेबाबत विविध प्रसिध्दी माध्यमातून व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी, जेणेकरुन सर्व शेतकऱ्यांना योजना माहिती होईल, तसेच, योजनेचा तपशील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद येथील नोटीस बोर्डवर शेतकऱ्यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करावा. कृषि विभागामार्फत घेण्यात येणा-या विविध शेतकरी मेळाव्यात, प्रशिक्षण कार्यक्रमात कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर योजनेच्या व्यापक प्रसिध्दीची कार्यवाही करावी.

2) **<u>लाभार्थी निवडीचे निकष</u> -** (1) लाभार्थीच्या स्वत:चे नावे शेत जमीन, 7/12 व 8-अ उतारा असणे आवश्यक आहे. (2) लाभार्थी निवडतांना लहान, सिमांतिक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती, महिला, अपंग या प्रंवर्गातील लाभार्थ्यांना शासनच्या प्रचलीत धोरणानुसार प्रथम प्राधान्य द्यावे.

3) **<u>तालुकास्तर कार्यवाही</u> -** गट विकास अधिकारी/कृषि अधिकारी, पंचायत समिती यांनी योजनेस प्रसिध्दी देवून इच्छूक शेतक-यांचे अर्ज मागवावेत. प्राप्त अर्जांची योजनेच्या निकषांनुसार छाननी करुन परीपुर्णत: पात्र ठरणाऱ्या अर्जांची प्राप्त दिनांकानुसार क्रमवारी लावावी. "प्रथम प्राप्त प्रथम प्राधान्य" या तत्त्वानुसार आलेल्या प्रस्तावाची नोंद घेण्यात यावी. लाभार्थी प्रवर्ग निहाय स्वतंत्र

लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी उद्युक्त करणे ही संबंधित कृषि विकास अधिकारी यांची जबाबदारी आहे. सदर प्रवार्गातील सर्व पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला असल्यास त्याची खात्री करुन तशी दप्तरी नोंदी घेणे व सदर लाभ इतर प्रवर्गातील लाभार्थ्यांना प्राधान्याने देणे व सरतेशेवटी त्याबाबतची नोंद घेऊन खुल्या प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत निर्णय घेणे अपेक्षित आहे.

कृषि विकास अधिकारी यांच्या मागणीनुसार लाभार्थ्यांना पुरवठादार संस्थांनी लाभार्थ्यांना औजारे/सयंत्रे इत्यादीचा पुरवठा करावा व पुरवठ्यानुसार पुरवठ्याची बिले, डीलेव्हरी चलन, रक्कम प्राप्त झाल्याचा तपशील व पुरवठा पूर्व गुणवत्ता तपासणी व पुरवठ्यानंतर क्षेत्रीय गुणवत्ता तपासणी अहवाल इ. सह परिपूर्ण प्रस्ताव कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावेत. संबधीत कृषि विकास अधिकारी यांनी प्राप्त प्रस्तावांची आठ दिवसात छाननी करावी व सदर प्रस्तावांस जिल्हयासाठी प्राप्त भौतिक व आर्थिक लक्षांकाचे आधीन राहून मान्यता देण्यात यावी. प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्याची छाननी तात्काळ करुन समायोजनासाठी सादर कराण्याची सर्वस्वी जबाबदारी कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. कोणत्याही परिस्थितीत विनाकारण प्रस्ताव प्रलंबित ठेवल्यास त्याची जबाबदारी सुध्दा संबंधित कृषि विकास अधिकारी यांची राहील.

6) **<u>औजारांची निवड व मागणी नोंदविण्याची कार्यपध्दती</u> -** कृषि औजारांच्या निवडीबाबत सर्वतोपरी पारदर्शकता ठेवण्याचे दृष्टीने जिल्हा/तालुका स्तरावर गठीत करावयाच्या समितीचे अनुषंगाने कृषि संचालक (नि. व गु. नि.) यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील. औजारांचा वेळेवर पुरवठा होण्याचे दृष्टीने कृषि विकास अधिकारी यांनी कामाचे नियोजन करुन वेळेत शासन नियुक्त पुरवठा संस्थांकडे मागणी नोंदवावी. कृषि यांत्रिकीकरणामध्ये केवळ ठराविक ओजारांची मागणी करण्याची प्रवृत्ती निदर्शनास येते. वास्तविक, ट्रॅक्टर/पॉवर टिलर चलीत, स्वयंचलीत, बैलचलीत कृषि औजारे पुरवठ्यास यांत्रिकीकरणाचे दृष्टीने प्राधान्य असूनही याबाबत अपेक्षित पध्दतीने प्रोत्साहनाची कार्यवाही काही जिल्हयात होत नसल्याचे निदर्शनास येते. याबाबत जनजागृतीची कृषि विकास अधिकारी यांची जबाबदारी आहे. त्यासाठी आवश्यकतेनुसार नवीन औजारांची शेतकऱ्यांना नजिकच्या तालुका बिजगुणन प्रक्षेत्रावर उपलब्ध औजारांव्दारे कृती प्रात्यक्षिके दाखवावीत.त्यासाठी पुरवठा संस्थांचे व उत्पादकांचे आवश्यक ते सहकार्य घ्यावे, जेणेकरुन आधुनिक औजारांचा वापर, उपयुक्तता व देखभाल बाबत शेतकऱ्यांना माहिती होईल. व त्याचा योग्य प्रचार व प्रसार होईल विशेष प्रयत्न न करता केवळ मागणी नाही या सबबीखाली ठराविक कृषि औजारांसाठी वर्षाच्या अखेरीस आग्रही भूमिका घेणे संंयुक्तिक नाही याची नोंद घ्यावी. अशा प्रकारे कार्यवाही निदर्शनास आल्यास संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. लाभधारकांना कृषि औजारांचा वेळेवर पुरवठा होवून त्याचा योग्य उपयोग होण्याचे दृष्टीने वेळेवर मागणी नोंदविणे बंधनकारकराहील. कृषि औजारांच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी अपेक्षित प्रयत्न न करता वर्ष अखेरीस घटकांत बदल करण्याची प्रवृत्ती आढळल्यास संबंधितांनां विरुध्द कारवाई करणे क्रमप्राप्त ठरेल, याची नोंद घ्यावी. कृषि यांत्रीकिकरण योजनांतर्गत पुरविण्यात येणारी कृषि औजारे/सयंत्रे शासनाने निर्धारीत केलेल्या दराने शासन नियुक्त पुरवठा संस्थामार्फत पुरविण्यात येतील शेतक-यांची मागणी

